# पाचवा महाराष्ट्र राज्य वित्त आयोग

## द्वारा-वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

### सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

वित्त विभागांतर्गत पाचव्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाच्या कामासाठी राज्य शासनातील कार्यरत अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने/सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची/ कर्मचाऱ्यांची पाचव्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचे कार्यालय, मुंबई (मंत्रालयानजीक) येथे १० महिन्यांकरिता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांची नियुक्ती शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७ डिसेंबर,२०१६ मधील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

अधिक माहिती व अर्जाचा नमूना विभागाचे संकेतस्थळ https://finance.maharashtra.gov.in or www.mahakosh.maharashtra.gov.in/career-recruitment वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईटवरील माहिती पाहून अर्ज करावेत.

अर्ज पाठविण्याचा अंतिम दिनांक ०४ जून,२०१८ असा आहे.

# पाचवा महाराष्ट्र राज्य वित्त आयोग, मुंबई

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ अंतर्गत महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आलेली असून आयोगाच्या कामासाठी सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

विभागाची आवश्यकता :

१. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ आय व २४३ वाय तसेच महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतुद) अधिनियम,१९९४ च्या तरतुदीस अनुसरुन दि.२८ मार्च,२०१८ च्या अधिसूचनेनुसार ५ व्या वित्त आयोगाची स्थापना करण्यात आलेली असून ५ व्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगासाठी खालील पदे निर्माण करण्यास तसेच ही पदे नियमितपणे शक्य न झाल्यास राज्य/केंद्र, शासकीय, निम-शासकीय, मंडळ आस्थापनांमधील समकक्ष वेतनश्रेणी संवर्गातील सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांमधून किंवा बाहय स्तोत्राद्वारे मुंबई येथे १० महिन्यांच्या कालावधीकरिता करार पध्दतीने भरावयाची आहेत.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी | पदसंख्या | आवश्यक पात्रता/अर्हता |
|---|---|---|---|
| १ | सह/उप सचिव | १ | १) मंत्रालयातील सह/उप सचिव,नगरविकास/ग्रामविकास/वित्त विभाग यातील आस्थापना, योजना, अर्थ वित्त आयोग याशी संबंधित कामकाजाचा ३ वर्षांचा अनुभव.<br>२) संगणक वापराचे ज्ञान आवश्यक. |
| २ | अवर सचिव | १ | १) आस्थापना/योजना/वित्त आयोग/ अर्थसंकल्प या विषयाचा मंत्रालयीन अवर सचिव पदावरील कामकाजाचा ३ ते ५ वर्षांचा पर्यवेक्षीय अनुभव<br>२) संगणक वापराचे ज्ञान असणे आवश्यक |
| ३ | कक्ष अधिकारी | १ | १)मंत्रालयातील आस्थापना/योजना/वित्त विषयक बाबींमधील कक्ष अधिकारी पदावरील किंवा समकक्ष वेतनश्रेणीतील/संवर्गातील ग्रामविकास विभाग, नगरविकास विभागांतर्गत नगरपालिका क्षेत्रीय कार्यालयातील कामकाजाचा ३ ते ५ वर्षांचा अनुभव<br>२) संगणक वापराचे ज्ञान असणे आवश्यक |
| ४ | सहायक कक्ष अधिकारी | १ | १)मंत्रालयातील आस्थापना/योजना/वित्त विषयक बाबींमधील सहायक कक्ष अधिकारी पदावरील ३ ते ५ वर्षांचा अनुभव<br>२) संगणक वापराचे ज्ञान असणे आवश्यक |
| ५ | लघुलेखक इंग्रजी (उच्चश्रेणी/ निम्नश्रेणी) | १ | १)इंग्रजी श्रुतलेखन १०० शब्द प्रति मिनिट व टंकलेखक ४० शब्द प्रति मिनिट |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | २) संगणक वापराची ज्ञान आवश्यक (उदा: MS-Excel, MS-Word)<br>३) इंग्रजी व मराठी दोन्ही टंकलेखन व श्रुतलेखन येत असल्यास प्राधान्य<br>४)राज्य शासन/केंद्र शासन/निम-शासकीय कार्यालयातील २ ते ३ वर्षांचा अनुभव |
| ६ | सांख्यिकी अधिकारी | २ | १)गोळा केलेल्या माहितीची छाननी, विश्लेषण करणे या कामाचा अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील सांख्यिकी अधिकारी पदावरील ३-५ वर्षांचा अनुभव<br>२)संगणकाच्या वापराचे ज्ञान आवश्यक. विशेषत: एक्सलमध्ये काम करणे आवश्यक. |
| | एकूण | ७ | |

अटी व शर्ती :-

१) सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांची नियुक्ती केवळ १० महिन्यांकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर,२०१६ च्या तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.

२) विभागास आवश्यक असलेली अर्हता धारण करणा-या मागील दोन वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

४) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

५) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्हयात राहणारा असावा.

६) आवश्यक अर्हता धारण करणा-या इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांनी/कर्मचा-यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

७) उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज दिनांक ०४-६-२०१८ पर्यंत “उप सचिव (वित्त आयोग कक्ष), ५ वा मजला, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.” या पत्त्यावर पोहोचेल अशारितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीश: आणून द्यावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२८२८९९२ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

८) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार आयोगाला राहील.

१०) पात्र उमेदवारांची मुलाखत अर्जाच्या शेवटच्या दिवसानंतर तात्काळ घेण्यात येईल. याबद्दल भ्रमणध्वनीवरुन सूचना देण्यात येईल.

११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिका-यांस/कर्मचा-यास वित्त आयोग, मुंबई येथे काम करावे लागेल.

---------

# <u>अर्जाचा नमुना</u>

## <u>सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज</u>

उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-.................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-.................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-.................................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :-.................................................................

५) जन्म दिनांक व वय :-.................................................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

७) अनुभव :-.................................................................

वित्त विभागात स्थापन करण्यात आलेल्या वित्त आयोगात करार पध्दतीने नियुक्तीबाबतची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील/सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी